**<u>ठळक बातम्या</u>**

- वक्फ सुधारणा विधेयकाविषयी नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीचा मसुदा अहवाल मंजूर
- ‘इस्रो’नं केलं उपग्रह घेऊन जाणाऱ्या शंभराव्या अग्निबाणाचं यशस्वी प्रक्षेपण
- दिल्ली विधानसभा निवडणुकासाठी प्रचाराची रणधुमाळी सुरु
- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ट्रायथलॉन प्रकारात महाराष्ट्राच्या डॉली पाटील हिला सुवर्ण पदक

**आणि**

- अभिनेता सैफ अली खान हल्ला प्रकरणी आरोपीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**<><><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयक २०२४ च्या संयुक्त संसदीय समितीचा अहवाल आज मंजूर करण्यात आला. समितीमधल्या १४ दुरुस्त्या स्वीकारल्याचं समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी वार्ताहरांना सांगितलं. हा अहवाल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना उद्या सादर केला जाणार आहे. गेले सहा महिने या अहवालावर सखोल चर्चा झाल्याचं जगदंबिका पाल यांनी सांगितलं. देशभरात वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन आणि नियमन सुधारणं हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे.

दरम्यान, विरोधी पक्षातल्या सदस्यांनी या अहवालावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. हा अहवाल घाईघाईत स्वीकारल्याचं द्रमुकचे नेते डी. राजा म्हणाले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत आणि तृणमूल काँग्रसचे कल्याण बॅनर्जी यांनी अहवालाच्या विरोधात मतदान केलं.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सरकारने उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन शुक्रवारपासून सुरू होणार आहे. शुक्रवारी आर्थिक पाहणी अहवाल सादर होईल. शनिवारी १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर करतील. निर्मला सीतारामन यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाचं थेट प्रसारण आकाशवाणीवरून होणार आहे. त्यामुळे आकाशवाणी मुंबईवरून दुपारी दीड वाजता प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र या भाषणानंतर प्रसारित होईल.

**<><><><><>**

प्रयागराज महाकुंभात आता परिस्थिती नियंत्रणात असून साधू महंतांचं स्नान सुरु झाल्याचं सूत्रांनी सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत, त्यांनी वेळोवेळी आपल्याशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली, असं उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज सांगितलं. उत्तरप्रदेशात मधल्या प्रयागराज इथं सुरु असलेल्या कुंभमेळ्यात मौनी अमावस्येनिमित्त आज अलोट गर्दी झाली आहे. त्यातल्या आखाडा मार्गावर लावलेली फाटकं ओलांडताना काल रात्री अनेक जण जखमी झाले. जखमींना तातडीनं रुग्णालयात उपचारांसाठी हलवलं असल्याचं

आदित्यनाथ यांनी सांगितलं. या चेंगराचेंगरीत जखमी झालेल्यांची नक्की संख्या समजू शकली नाही मात्र सुमारे २५ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत असल्याचं हिंदुस्थान समाचारने दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

प्रयागराज इथल्या महाकुंभात झालेली चेंगराचेंगरीची घटना दुर्दैवी असून त्यामध्ये जीवित हानी झालेल्या भाविकांच्या नातलगांप्रती शोक संवेदना व्यक्त करत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मृतांना श्रद्धांजली वाहिली आहे. तसंच जखमींना लवकर बरं वाटावं अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाकुंभ इथं झालेल्या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. ज्या भाविकांनी नातेवाईक गमावले आहेत, त्यांच्याबद्दल तीव्र संवेदना असल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरून म्हटलं आहे.

**<><><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देखील या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त करत मृतांना श्रद्धांजली वाहिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. जखमींच्या आरोग्यात लवकरच सुधारणा होईल, अशी आशा देखील फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इस्रोनं एन व्ही एस झिरो टू या उपग्रह घेऊन जाणाऱ्या अग्निबाणाचं यशस्वी प्रक्षेपण केलं.

जीएसएलव्ही एफ - 15 हा प्रक्षेपक आज सकाळी सहा वाजून २३ मिनिटांनी श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून सोडण्यात आला.

इसरोतर्फे झालेलं हे शंभरावं अग्निबाण उड्डाण होतं. एनव्हीएस ओ टू हा उपग्रह त्याच्या कक्षेत स्थिरावला असून तो दूरसंचार, दिशादर्शन आणि हवामान शास्त्रासाठी उपयुक्त ठरणार आहे. इस्त्रोसाठी ही एक ऐतिहासिक कामगिरी आाहे, अशा शब्दात इस्त्रोचे प्रमुख व्ही. नारायणन यांनी आनंद व्यक्त केला.

**<><><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे नेते मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. भाजपा, आम आदमी पार्टी आणि काँग्रेसमधले प्रमुख नेते त्यांच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ रॅली, रोड शो करत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज शाहदरा मतदारसंघातल्या कर्तार नगर इथे जाहीर सभा घेतली. केंद्रीय मंत्री नितिन गडकरी आणि **हे मटियाळा आणि विकासपुरी इथे तर केंद्रीय मंत्री** मनोहरलाल खट्टर यांच्याही सभा घेणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपाचे स्टार प्रचारक असून पुढचे तीन दिवस ते दिल्ली दौऱ्यावर आहेत. आज रोहिणी इथे त्यांची प्रचार सभा होईल. त्यानंतर ते पहाडगंज परिसरात मराठी विभागाच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

आम आदमी पार्टीचे समन्वयक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांचे रोड शो होणार असून बवाना इथं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांची सभा होणार आहे.

**<><><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आज काँग्रेस पक्षानं जाहीरनामा प्रसिद्ध केला. दिल्ली प्रदेश काँग्रसच्या कार्यालयात झालेल्या वार्ताहर परिषदेत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी जाहीरनाम्याविषयी माहिती दिली. हा जाहीरनामा जय बापू, जय भीम आणि जय संविधान या संकल्पनेवर आधारित असल्याचं ते म्हणाले. काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्यास महिलांना दरमहा अडीच हजार रुपये तसंच, ५०० रुपयांत गॅस सिलिंडर, मोफत धान्य, सर्वांसाठी २५ लाखांचा वैद्यकीय विमा, बेरोजगार तरुणांना अडीच हजार रुपयांचं विद्यावेतन, ३०० युनिटपर्यंत मोफत वीज अशी आश्वासनं या जाहीरनाम्यात दिली आहेत.

**<><><><><>**

**जीबीएस** अर्थात गुइलेन बॅरे सिंड्रोमचे अधिक रुग्ण सापडत असल्यानं पुण्यातल्या राजाराम पूल ते खडकवासला दरम्यानचा  भाग बाधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे. या भागात महापालिकेकडून घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यासाठी ८५ पथक नेमण्यात आली आहेत. या आजारावर नियंत्रण मिळवण्यात यश येत असल्याचं आरोग्य विभागाच्या प्रमुख डॉक्टर नीना बोराडे यांनी सांगितलं.  **सोलापूर  आणि कोल्हापूर** मधे जीबीएसचे दोन रुग्ण आढळून आले आहेत. यात एका बारावर्षीय मुलीचा आणि एका ६० वर्षीय प्रौढ व्यक्तीचा समावेश आहे. दोन्ही रुग्णांवर उपचार सुरू आहेत. **लातूर**च्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जीबीएसचे दोन संशयित रुग्ण दाखल झाले आहेत. त्यातील एकाचा अहवाल निगेटिव्ह आला असून एक जणाचा अहवाल येणं बाकी आहे.

**<><><><><>**

उत्तराखंड इथे सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ट्रायथलॉन प्रकारात महाराष्ट्राच्या डॉली पाटील हिने सुवर्ण पदक तर पार्थ मिरगे याने कास्यपदक पटकावलं आहे. महिला गटात डॉली हिने एकूण १ तास १० मिनिटं आणि ३ सेकंदांमध्ये ही स्पर्धा पूर्ण करत सुवर्ण पदक पटकावलं. तर महाराष्ट्राच्याच मानसी मोहिते हिने १ तास १० मिनिटं आणि ४३ सेकंदांमध्ये स्पर्धा पूर्ण करून रौप्य पदक पटकावलं. पुरुष गटात पार्थ याने १ तास १ मिनिट १४ सेकंद या वेळेत ही स्पर्धा पूर्ण केली आणि कांस्य पदक पटकावलं. तर मणिपूरच्या सारंगबम मेईतेई या स्पर्धकाने सुवर्ण तर तेलहेबा सोरम याने रौप्य पदक पटकावलं.

**<><><><><><>**

अभिनेता सैफ अली खान याच्यावरच्या हल्ला प्रकरणातला आरोपी मोहम्मद शरिफुल इस्लाम शहजाद याला न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली आहे. त्याची पोलीस कोठडी आज संपल्यावर त्याला आज न्यायालयापुढे हजर करण्यात आलं. त्याच्याकडून एक चाकू जप्त केला असून तो न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवल्याची, तसंच हल्ला करण्यापूर्वी त्यानं सैफ अली खान याच्या घराची रेकी केल्याची माहिती पोलिसांनी सुनावणीदरम्यान दिली.

**<><><><><><>**

महसूल गुप्तचर संचालनालयाच्या मुंबई विभागाच्या अधिकाऱ्यांनी मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर केलेल्या कारवाईत दोन किलोपेक्षा जास्त वजनाचं कोकेन जप्त केलं आहे. युगांडाहून आलेल्या तीन

प्रवाशांवर ही कारवाई झाली असून त्यांना अटक झाली आहे. या तिघांनी कोकेनच्या कॅप्सूल्स पोटात ठेवल्याचं निष्पन्न झालं. जप्त केलेल्या कोकेनचं आंतरराष्ट्रीय बाजारातलं मूल्य २१ कोटी ९७ लाख रुपये आहे.

**<><><><><>**

अहिल्यानगर इथल्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर प्रशांतकुमार पाटील यांचं आज पहाटे आकस्मिक निधन झालं. डॉक्टर पाटील यांनी मुंबईच्या केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या संचालक पदाची तसंच तंत्रज्ञान हस्तांकरण प्रमुखपदाची जबाबदारी सांभाळली होती. डॉक्टर पाटील यांच्या आकस्मिक निधनामुळे कृषी विद्यापीठामध्ये शोकाकुल वातावरण झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**<><><><><>**

कुष्ठरोगबाधितांना शोधून त्यांच्यावर उपचार करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उद्यापासून कुष्ठरुग्ण शोध अभियानाची सुरुवात होणार आहे. उद्यापासून ते १४ फेब्रुवारीपर्यंत हे अभियान चालणार असून १८१ पथकं तयार करण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून पालिका क्षेत्रातल्या ९८ हजार ५४२ घरांना भेटी देऊन तपासणी तसंच उपचारांसाठी मार्गदर्शन केलं जाणार आहे.

**//<><><><><>//**